International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-15 May-Jun -2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-Jun -2022 Volume-2 Issue-15*

*On*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Editor**
**Prof. Dr. Deepak M. Bharti**
Principal
Arts, Commerce and Science College, Kille Dharur, Dist. Beed [M.S.]

**Co- Editor**
**Mr. G. D. Bavaskar**

**Published by-** P. R. Talekar, Secretary, Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**



Scanned by CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.15 May-June-2022

CONTENTS


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | Domination Of Gender For Pleasurable Career<br>**Dr Tejas R Sharma** | 1-4 |
| 2 | Depiction Of Indian Culture & Society In The Graphic Novels<br>**Dr. Arya D. W, Miss Kendre S. A** | 5-8 |
| 3 | Chimamanda Ngozi Adichie's Idea Of Feminism & Her Depiction Of Women In Her Literary Works<br>**Dr. Arya D. W, Miss Kendre S. A** | 9-11 |
| 4 | Gender Asymmetry In India's Foreign Policy Decision Making<br>**Vishakha Jha** | 12-16 |
| 5 | The Sri Lankan Identity Related With The Concept Of God Skandha Kumara<br>**Dr. Amila Damayanthi** | 17-21 |
| 6 | Women Empowerment: A Study Of Jaishree Misra's Ancient Promises<br>**Mr. Gajanan Telang, Dr.Vaishali Aher** | 22-24 |
| 7 | Gender And Education In India<br>**Mr. Sushilkumar Sadashiv Raut** | 25-26 |
| 8 | Lgbt And Human Rights<br>**Nitu Changdeo Deshbhratar, Kanchan Babarao Jambhulakr** | 27-32 |
| 9 | Aspects Of Gender Negotiation And Feminism In The Works Of Jeanette Winterson<br>**Pouria Mallahi** | 33-34 |
| 10 | Gender Wise Impact Of Pandemic On Informal Sector Study Among Women Domestic Workers In Pune<br>**Dr. Narshing Giri, Mrs. Umrao Sayyad , Mr. Rushikesh Hiwale** | 35-38 |
| 11 | Violation of Dalits Human Rights and Gender Equality in India and its Remedies<br>**Dr Chitade Nandkishor Pandurang** | 39-42 |
| 12 | Recent Trends Of Poverty In India<br>**Dr. Nasiket Govindrao Suryavanshi** | 43-48 |
| 13 | Agricultural Labourers Problems And Remedies In India<br>**Dr. Maneesh. B** | 49-51 |
| 14 | Gender And Health<br>**Gadekar pandurang Chandrakant** | 52-53 |
| 15 | लिंगभाव विषमता आणि बंजारा समाजातील स्त्रिया<br>**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड** | 54-56 |
| 16 | लिंगभाव आणि भारतीय महिलांची आर्थिक स्थिती<br>**गोविंद द. बावस्कर** | 57-59 |
| 17 | कृषीच्या विकासात स्त्रियांची भूमिका<br>**प्रा .डॉ. दीपक एम .भारती ,गोविंद रामराव काळे** | 60-62 |
| 18 | स्त्री-पुरुष वेतन अंतर<br>**प्रोफेसर दीपक एम. भारती, साबरे ज्योती जालिंदर** | 63-64 |
| 19 | लिंगभाव आणि समाजीकरण<br>**डॉ. गणेश तुकाराम मोकासरे** | 65-67 |
| 20 | लैंगिक समाजीकरण और भारतीय समाज : एक समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य<br>**Dr. Usha Kiran Tiwari** | 68-70 |
| 21 | नैतिकता के दुष्चक्र में बेहाल नारी<br>**डॉ. अरविंद अंबादास घोडके** | 71-73 |
| 22 | जागतिक लिंग असमानता<br>**प्रोफेसर दिपक .एम . भारती, मैंद आनंद श्रीकृष्ण** | 74-76 |
| 23 | परिवार में लिंग और लैंगिक असमानता विषयक दृष्टिकोन<br>**डॉ. गजानन खंडू सोनुने , डॉ. जयसिंग पोपटसिंग सिंगल** | 77-80 |




Scanned by CamScanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.15 May-June-2022

# लिंगभाव विषमता आणि बंजारा समाजातील स्त्रिया

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड[1] प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड[2]
[1]शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता. कळंब
[2]संशोधन मार्गदर्शक व विभागप्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, लातुर

**प्रास्ताविक :**

समकालीन भारतातील लिंगभाव विषमता आणि विविध जाती जमातीतील महिलांच्या समस्या, लक्षात घेतले असता, बंजारा समाजातील स्त्रियांच्या पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील समस्या असल्याचे दिसून येते. म्हणून या लेखात लिंगभाव विषमता आणि बंजारा समाजातील स्त्रियांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. लिंगभाव हा शब्दप्रयोग समाजशास्त्रीय अर्थाने किंवा संकल्पनात्मक वर्गीकरण करण्यासाठी केला जातो. त्याला एक विशिष्ट अर्थ आहे. या नवीन अर्थानुसार लिंग या संज्ञेचा वापर स्त्री आणि पुरुषांची सामाजिक आणि सांस्कृतिक व्याख्या स्पष्ट करण्यसाठी करतात. मराठीत याला लिंगभाव असे म्हटले जाते. स्त्री पुरुषांचे स्थान व भूमिका यात समाजात कसा भेद केला जातो. याचा या संज्ञेमुळे आकलन केले जाते. म्हणजेच स्त्री-पुरुष संबंधीचा सामाजिक वास्तविकतेचे आकलन होण्यासाठी विशेषणाचे एक साधन म्हणून हि संकल्पना वापरली जाते.

लिंगभाव हि एक अशी संकल्पना आहे की, जी जैविक भेदापेक्षा वेगळी आहे. प्रत्यक्षात स्त्री पुरुषातील जैविक भिन्नत्व दर्शविण्यासाठी लिंग या संकल्पनेचा विचार केला जातो. तर Gender अर्थात लिंगभाव हि संकल्पना स्माजाद्वारे स्त्री-पुरुषामध्ये निर्माण झालेल्या सामाजिक भिन्नत्वाशी संबंधित असल्याचे आढळून येते. जन्म घेतलेले प्रत्येक नवजात अर्भक सुरुवातीला एक जैविक प्राणी असते, पण सामाजिकरणाच्या माध्यमातून त्याच्यावर वेगवेगळे संस्कार करून, हाडामासाच्या त्या जीवाला स्त्री किंवा पुरुषात रुपांतरीत केले जाते. म्हणजेच Gender हि संकल्पना स्त्रीत्व किंवा पुरुषत्व यांच्या समांतर आणि सामाजिक स्वरूपावर आधारित असलेल्या असमान विभाजनाशी संबंधित आहे. जगाच्या इतिहासात कोणत्याच सामाजिक व्यवस्थेने नैसर्गिक लिंगभेदाचा वापर, विस्तार व विकृतीकरण आमच्या भारतीय समजाएवढे क्रूरपणे इ सुव्यवस्थितपणे केलेले नसेल. या व्यवस्थेने प्रथम नैसर्गिक लिंगभेद कृत्रिमपणे सामाजिक लिंगभावात रुपांतरीत केले. नरातून पुरुषत्व व मादीतून स्त्रीत्व निर्माण केले. खरे म्हणजे पुरुष/नर म्हणजेच मानवजात आणि स्त्री म्हणजे केवळ मादीपण अशीच धारणा तयार करून आता हि व्यवस्था त्यांना नैसर्गिक मानते आणि स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक, लैंगिक, मानसिक शोषण करण्याची वाट मोकळी करून देते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. लिंगभाव संकल्पना समजून घेणे.
2. बंजारा स्त्रियांचे जीवनमान समजून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

लिंगभाव विषमता आणि बंजारा समाजातील स्त्रियांचे जीवनमान या संशोधन लेखाचे उद्दिष्ट अभ्यासात असताना वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. एखाद्या सामाजिक घटनेचे शास्त्रीय विश्लेषण करण्यासाठी तथ्ये संकलित करून अध्ययन करणे म्हणजेच सामाजिक घटनांचे वर्णनात्मक अध्ययन होय. प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**तथ्य संकलन :** प्रस्तुत संशोधन लेख अध्ययनाच्या अनुषंगाने तथ्य संकलन करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला. यासाठी संदर्भग्रंथ, वर्तमानपत्र, संशोधन साहित्य, मासिके, अहवाल, महिलांच्या परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या विविध संस्थाचा आढावा व इंटरनेट वरील सबंधित साहित्याचा आधार घेण्यात आला आहे.



Scanned by CamScanner

**लिंगभावाची संकल्पना :-**लिंग- लिंग हे नैसर्गिक असते. तसेच ते जीवशास्त्रीय असते. स्त्री-पुरुषांच्या जननेन्द्रीयातील फरकामुळे ते दृश्य स्वरूपाने आहे. लिंगातील भेद हे प्रजनन प्रक्रियेतील कार्यावर अवलंबून असते. लिंग हे शक्यतो सहजासहजी बदलता येत नाहीत. लिंग हे सर्वत्र सारखे असते ते स्थिर स्वरूपाचे असते.

लिंगभाव- लिंगभाव ही संकल्पना सामाजिक व सांस्कृतिक असून ती मानवनिर्मित आहे. ती भूमिका, गुण, वर्तन प्रकार व जबाबदाऱ्या इत्यादींची स्त्रीयोचीत व पुरुषोचीत अशी विभागणी करणे. विचारवन्ताच्या मते, लिंगभाव ही एक सामाजिक व सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री ची बाईपणात इ पुरुषांची पुरुषापणात होणारी सामाजिक घडवणूक सूचित होते. एखादी व्यक्ती स्त्री किंवा पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाईपण व पुरुषपण मात्र स्थळ काळरूप बदलणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक निकषांनी ठरते.

**बंजारा समाजातील स्त्रिया आणि लिंगभाव विषमतेचे स्वरूप :-**

भारतीय समाजातील बंजारा तथा अन्य कोणत्याही समाजातील स्त्रियांना वेगवेगळ्या समस्यांना नियमितपणे तोंड द्यावे लागते. भारतीय समाजातील स्त्रियांच्या प्रमुख समस्या म्हणून स्त्री-पुरुष विषमता आणि स्त्रियांना दिलेला दुय्यम स्थान, यामुळे आजही स्त्रियांवर होणारे शोषण कमी झालेले अथवा थांबलेले दिसून येत नाही. यामुळे आजच्या समकालीन विकसनशील असलेल्या भारतात स्त्रियांच्या समस्या कमी तर झालेल्या नाहीत परंतु २१ व्या शतकात स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार मात्र वाढलेले दिसून येतात. बंजारा समाज देखील याला अपवाद नाही. कारण की, वर्षानुवर्ष भटकंती करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणारे बंजारा लोक स्वतंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात हा समाज भारतातील वेगवेगळ्या राज्यात स्थिर होताना दिसून येतो. परंतु या दरम्यान बंजारा समाजातील स्त्रियांना अनेक आव्हानाला सामोरे जावे लागले आहे. प्रभुत्वशाली जाती समूहाच्या लोकांकडून या समाजाचे व विशेषता स्त्रियांचे शोषण झालेले दिसून येते. तसेच पुरुषप्रधान संस्कृतीचे आदर करणारे अशी भारतीय समाजाची ओळख असल्यामुळे यावरून हे लक्षात की, समाजातील लोक देखील स्त्रियांना दुय्यमत्वाचे स्थान दिलेले दिसून येतात. म्हणून असे स्पष्ट होते की, बंजारा समाजात देखील स्त्री-पुरुष विषमता असल्याचे दिसून येते. बंजारा समाजातील स्त्रियांना विविध क्षेत्रात जीवन जगताना शोषणाला, विषमतेला सामोरे जावे लागते. स्त्रियांच्या विषमतेच्या संदर्भातील विविध क्षेत्राविषयी पुढीलप्रमाणे माहिती स्पष्ट करता येईल.

**कौटुंबिक व वैवाहिक क्षेत्रातील लिंगभाव विषमता :-**

बंजारा समाजातील स्त्रियांना कौटुंबिक व वैवाहिक क्षेत्रात जवळपास बहुतेक स्त्रियांना लिंगभाव विषमतेला बळी पडावे लागते. काही अपवाद वगळता सर्वच कुटुंबे पितृसत्ताक, पुरुषसत्त्व असल्यामुळे पुरुषांना सर्वच बाबतील उच्च अधिकार प्राप्त झाले आहेत. कुटुंबातील सर्वच कमी मूल्यांचे, महत्वाचे व कठीण कामे स्त्रियांना करावी लागतात. त्यातून कौटुंबिक क्षेत्रात लिंगभाव विषमता दिसून येते. तसेच विवाह करण्याचा, जोडीदार निवडण्याचा, मुलांना जन्म देण्याचा अधिकार पुरुषांनाच दिसून येतो. त्यामुळे विवाह बाबतही स्त्रियांना लिंगभाव विषमतेला सामोरे जावे लागते.

**सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातील लिंगभाव विषमता :-**

सामाजीकरणाच्या माध्यमातून स्त्रियांचे रुपांतर स्त्रीपणात व पुरुषांचे रुपांतर पुरुषपणात केले जाते. त्यासाठी सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा खूपच प्रभाव दिसून येतो. सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत स्त्रियांना दुय्यमत्व प्राप्त झाले आहे. स्त्री कितीही कर्तुत्ववान असली तरी समाजात तिची प्रतिष्टा पुरुषांच्या तुलनेत कमीच असते. धार्मिक कार्य करण्यासाठी सुद्धा समाज व संस्कृतीने पुरुषाला झुकते माप दिले आहे. उदा. विधवा स्त्री, धार्मिक कार्य करू शकत नाही. हे आजही बंजारा समाजात दिसून येते. कारण की, हे चित्र बंजारा समाज व इतर समाजात हि दिसून येते. म्हणून असे म्हणता येते की, आजही बंजारा समाजातील सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रातील लिंगभाव विषमता संपुष्टात आलेली नाही. परंतु हि विषमता आजही वास्तव रुपात समाजात असल्याचे विविध कार्यातून स्पष्ट दिसून येते.





Scanned by CamScanner

**शैक्षणिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रातील लिंगभाव विषमता :-**

बंजारा समाज हा अनेक वर्ष भटकंती करीत होता. १९ व्या आणि २० व्या शतकात हा समाज वेगवेगळ्या राज्यात स्थिर स्थिरावलेला दिसतो. परंतु पूर्णतः अविकसित अवस्थेत असलेली जीवनशैली तसेच पारंपारिक व्यवसायातून बाहेर पडल्यानंतर कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी संघर्ष करण्याची वेळ या समाजावर आलेली होती. समाजातील लोकांना कोणत्याही प्रकारचे शिक्षण व राजकिय संधी मिळालेली नव्हती. अशा अवस्थेत स्त्रियांची तर अत्यंत अवहेलना होत होती. निरक्षरतेचा अभाव फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शोषणाला बळी पडत असत. भारतीय स्त्रियांचे श्रमाच्या आधारावर देखील लिंगभाव होताना दिसून येते. कुटुंबातील कठीण कार्य हे स्त्रियांना दिले जाते तर चांगले, प्रतिष्ठित व आनंददायी कार्य पुरुषांकडे दिले जाते. म्हणजेच श्रमविभाजन हे लिंगभाव यावर आधारित केले जाते. अर्थकारणाशी संबंधित असणाऱ्या विविध क्षेत्रातही स्त्री आणि पुरुष असा भेदभाव केला जातो. स्त्रियांना आर्थिक निर्णयापासून वंचित ठेवणे, शेती, घर व इतर मालमत्ता इत्यादी पासून वंचित ठेवणे यासाठी लिंगभाव विषमतेचा आधार घेतला जातो.

**साहित्य, समाज माध्यम आणि आरोग्य या क्षेत्रातील लिंगभाव विषमता :-**

मानवी समुहात वेगवेगळ्या माध्यमातून स्त्री विषयक विषमता दिसून येते. शालेय साहित्य असेल, समाजमाध्यमे चित्रपट, लघुचित्रपट व जाहिरातीमध्ये स्त्रियांना पुरुषापेक्षा भिन्न भावनिक, हाळव्या, शोषित भूमिका देतात. तसेच सौंदर्याचे प्रदर्शन करण्यास भाग पाडले जाते. त्यातून लिंगभाव विषमता दिसून येते. आरोग्याच्या बाबतीत देखील दुजाभाव केल्याचे अनेक स्त्रियांना अनुभव आलेला आहे. स्त्रियांना उपवास, वृत्तवैकल्य करणे, आजारपणात विश्रांती न देणे, गर्भ अवस्थेत श्रमाचे काम करणे, तात्पुरत्या व अघोरी स्वरूपाचे उपचार करणे इत्यादीमुळे स्त्रीयाच्या आरोग्यावर दुष्परिणाम होवून अनेक स्त्रिया मृत्युमुखी पडतात. म्हणजेच लिंगभाव विषमतेला स्त्रियांना सामोरे जावे लागते. अशाच स्वरुपाची परिस्थिती बंजारा समाजात ही आहे. परंतु बंजारा समाजातील स्त्रियांचे शोषणाचे स्वरूप हे वेगवेगळे आणि विविध स्वरूपाचे असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :-**

देशातील बंजारा समाज असेल किंवा इतर कोणत्याही जाती जमातीत आजही लिंगभाव विषमता असल्याचे दिसून येते. ही लिंगभाव विषमता असल्याचे कारण म्हणजे जात, वंश आणि वर्ग या विषमतेप्रमाणे स्त्री- पुरुषांमधील विषमता सुद्धा पूर्णतः मनुष्यनिर्मित आहे. विशिष्ट ऐतिहासिक कालखंडामध्ये या विषमतेची निर्मिती केली गेली आणि म्हणूनच तिला प्रश्न विचारले जावू शकतात, आव्हान दिले जावू शकते आणि बदलही घडवून आणता येतो. स्त्री मुलांना जन्म देत असेल पण म्हणून ती दुय्यम ठरत नाही. तसेच त्यामुळे तिच्या शिक्षण किंवा नोकरी व्यवसायावर परिणाम होऊ नये. दोन भिन्न प्रकारची शरीरे असली तरी त्यामुळे त्यांच्यात विषमता का निर्माण व्हावी? यासाठी लिंगभाव आधारित सामाजीकरण व सामाजिक व सांकृतिक मानसिकता या सर्वामुळेच स्त्रियांना लिंगभाव विषमतेला सामोरे जावे लागल्याने सिद्ध होते.

**संदर्भग्रंथ सूची :-**


१. आगलावे प्रदीप (२००७), सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. कऱ्हाडे बी. एम. (२०१०), भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, पिंपळागुरे अंड कंपनी पुब्लीशर्स, नागपूर.
३. तांबे श्रुती, (२०१०), लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मय, मुंबई.
४. राठोड अंजली (२०१५), जालना जिल्यातील बंजारा व धनगर समाजातील स्त्रियांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध.
५. चव्हाण व्यंकट (२०१५), बंजारा लोकगीत समाज और संस्कृति, वाण्या पुब्लिकेशन्स, कानपूर.




प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड

Scanned by CamScanner